# तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर

जुने कंकुबाई नेत्र रुग्णालय,
श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय जवळ, सोलापूर

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग

दुरध्वनी क्रमांक - ०२१७ २७३१०१४  फॅक्स क्रं.- ०२१७ २७३१०१४
ई-मेल - tahuttarsolapur@gmail.com

क्र.२०२४/जमा-२/४२ब/एस आर - २७०/कावि - १०६७  दिनांक२१ / ५ /२०२४

**परिशिष्ट "अ"**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ब मधील तरतूदींन्वये**
**भोगवटादारास द्यावयाची सनद**
**(अकृषिक वापराची परवानगी)**

**ज्याअर्थी,**

श्री./श्रीमती ॲफेडेबल एकर्स प्रा.लि. मुंबईचे वतीने मॅनेजिंग डायरेक्टर व चेअरमन दिपक लक्ष्मीचंद बदलानी रा. गुरुशरण संकुल, रेल्वे लाईन्स, सोलापूर या जमिन धारकाने महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ब च्या तरतुदीन्वये जमिन सर्व्हे नं./गट नं. १९/१/अ/१/ब चे एकुण क्षेत्र २८७००.०० चौ.मी. गांव मौजे शिवाजी नगर तालुका उत्तर सोलापर जिल्हा सोलापूर या जमिनीवर रहिवास अकृषिक प्रयोजनासाठी, उक्त संहितेच्या कलम ४७अ नुसार देय रुपांतरण कराची वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम रु १०५०४२/- चलन क्र. MH००१९२८६४०२०२४२५E अन्वये दिनांक १३/०५/२०२४ रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या नियमांच्या आणि खालील शर्तीना अधिन राहून उपरोक्त जमिनीच्या धारकास सदर जमिनीवर, उक्त नमूद करण्यात आलेला अकृषिक वापर अनुज्ञेय करण्यात आल्याचे मानण्यात आल्याने उक्त संहितेच्या कलम ४२ब अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१. वरीलप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या अकृषिक वापरामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
२. जमिनीवर प्रत्यक्ष विकास अथवा बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम नियोजन प्राधिकरणाची विकास परवानगी घेणे आवश्यक राहिल.
३. जिल्हाधिकारी/नियोजन प्राधिकरण यांच्या मान्यतेने रेखांकन मंजूर केल्याशिवाय क्षेत्राची पोटविभागणी करता येणार नाही अथवा छोटे भूखंड करुन विक्री करता येणार नाही.
४. नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास, त्याची माहिती अशा मंजूरीपासुन ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे बंधनकारक राहिल.
५. अकृषिक वापर अनुज्ञेय करण्याच्या या सनदेव्यतिरिक्त वित्तीय संस्था / नियोजन प्राधिकरण यांनी इतर कोणत्याही स्वरुपातील बिनशेती आदेशाची मागणी करु नये.

२१.५.२४

(निलेश पाटील)
**तहसिलदार उत्तर सोलापूर**

**प्रत:-** तलाठी मौजे शिवाजी नगर यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी